चित्रपट निर्मिती, दूरचित्रवाणी मालिका, जाहिरातपट व माहितीपट इत्यादींच्या चित्रीकरणाच्या परवानगीसाठी एक खिडकी योजना (Single Window Clearance System) लागू करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

शासन निर्णय क्रमांक : गोचिन २०१६/प्र.क्र.१८९/सां.का.-१

मंत्रालय (मुख्य इमारत), तळमजला अभिलेख कक्ष,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- ४०० ०३२

दिनांक: ०४ मार्च, २०२२.

वाचा : १. शासन निर्णय क्र.गोचिन-२०१६/प्र.क्र.१८९/सां.का.१, दि.२२.०५.२०१८

२. महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांचे पत्र क्र.गोचिन २०१६/ प्र.क्र.१८९/ सां.का.१, दि.२१.११.२०१९

**प्रस्तावना :-**

विभागाच्या उपर्निर्दिष्ट दि.२२.०५.२०१८ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या स्तरावर एक खिडकी योजना सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. सदर शासन निर्णयात योजनेचे प्राथमिक स्वरुप व कार्यप्रणाली स्पष्ट करण्यात आली होती. पहिल्या टप्प्यात सदर योजनेत फक्त मुंबई शहर व उपनगरातील शासकीय / निमशासकीय यंत्रणांच्या अधिपत्याखाली येणाऱ्या चित्रीकरणस्थळांचा समावेश करण्यात आला होता. प्राथमिक टप्प्याच्या अंमलबजावणीत आलेले अनुभव लक्षात घेऊन आवश्यक बदलांसह योजनेची व्याप्ती संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

एक खिडकी योजनेत अंतर्भूत करण्यात आलेल्या शासकीय / निमशासकीय चित्रीकरण स्थळांवरील चित्रीकरणासाठी विहित कालावधीमध्ये संबंधित शासकीय / निमशासकीय विभागांशी समन्वय साधून आवश्यक परवानगी निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यासाठी शासन खालील निर्णय घेत आहे.

१. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई हे कार्यालय **"संनियंत्रण संस्था"** म्हणून काम पाहील.

२. एक खिडकी योजनेमार्फत केंद्र / राज्य शासनाच्या अधिपत्याखालील शासकीय / निमशासकीय चित्रीकरणस्थळांवरील चित्रीकरणासाठी राज्य शासकीय / निमशासकीय विभागांच्या आवश्यक त्या ना-हरकत / परवानग्या देण्यात येतील.

३. चित्रीकरणाकरीता आवश्यक परवानग्या मिळण्यासाठी संबंधित निर्मात्यांनी www.filmcell.maharashtra.gov.in या वेब पोर्टलवर ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज करणे आवश्यक आहे.

४. केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील चित्रीकरणस्थळावरील चित्रीकरणासाठी संबंधित चित्रिकरणस्थळाच्या प्राधिकृत विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे अनिवार्य आहे.

५. एक खिडकी योजनेमार्फत खाजगी चित्रीकरणस्थळावरील चित्रीकरणासाठी आवश्यक असणा-या शासकीय / निमशासकीय विभागांसंदर्भातील जसे की, पोलिस प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था अथवा तत्सम विभाग यांच्या ना-हरकत परवानग्या देण्यात येतील.

६. खाजगी चित्रीकरण स्थळावरील चित्रीकरणासाठी संबंधित चित्रीकरणस्थळाच्या मालकाचे / प्राधिकृत व्यक्तीचे ना-हरकत प्रमाणपत्र व ओळखपत्र अर्जासोबत सादर करणे अनिवार्य आहे.

७. खाजगी चित्रीकरणस्थळांवरील 'Indoor' चित्रीकरणासाठी कोणतेही तात्पुरते बांधकाम (Temporary Structure) अथवा सेट उभारण्याची आवश्यकता नाही, अशा चित्रीकरणासाठी देखील एक खिडकी योजनेच्या वेब पोर्टलवर अर्ज करणे व आवश्यक शुल्क अदा करणे संबंधित निर्मात्यास अनिवार्य असेल. सदर चित्रीकरणासंदर्भात आवश्यक ती सर्व माहिती संबंधित विभागाचे अधिकारी तसेच स्थानिक पोलीस ठाणे व वाहतूक शाखा यांच्या डॅशबोर्ड वर पोर्टलव्दारे प्राप्त होईल.

८. एक खिडकी योजनेमार्फत देण्यात आलेली परवानगी ही नमुद केलेल्या दिवसाकरीता व ठरविण्यात आलेल्या वेळेमध्ये सदर जागेवरील चित्रीकरणापुरतीच मर्यादित असून ही परवानगी कोणत्याही प्रकारे सदर जागेसंदर्भातील अधिकृत पुरावा म्हणून ग्राह्य धरता येणार नाही.

९. निर्मात्याने ऑनलाईन प्रणालीव्दारे त्यांना ज्या स्थळावर ज्या कालावधीसाठी चित्रीकरण करावयाचे आहे ते चित्रीकरण स्थळ त्या कालावधीसाठी उपलब्ध आहे किंवा नाही हे तपासून, ते उपलब्ध असल्यास संबंधित स्थळावरील चित्रीकरणाबाबतच्या अटी व शर्ती मान्य करुन त्यासाठी आवश्यक असणारे शुल्क ई-पेमेंटव्दारे [संबंधित शासकीय / निमशासकीय यंत्रणांनी (Stakeholders) त्यांच्या चित्रीकरण स्थळासाठी निश्चित केलेले शुल्क व आवश्यक त्या ठिकाणी निश्चित केलेली अनामत रक्कम] जमा केल्यानंतर निर्मात्यांना Order ID व Order Date प्राप्त होईल व त्यानंतर चित्रीकरणासाठीच्या परवानगीची प्रक्रिया सुरु होईल.

१०. निर्मात्याने आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर व त्याला Order ID व Order Date प्राप्त झाल्यानंतरच त्यांचा परवानगीबाबतचा अर्ज चित्रीकरणस्थळाशी संबंधित शासकीय / निमशासकीय यंत्रणा (Stakeholders) तसेच संनियंत्रण संस्था म्हणून काम पहाणाऱ्या चित्रनगरी महामंडळास वेब पोर्टलवरील डॅशबोर्ड वर प्राप्त होईल.

११. निर्मात्याचा अर्ज चित्रीकरण स्थळाशी संबंधित यंत्रणेला प्राप्त झालेल्या दिनांकापासून (म्हणजेच निर्मात्यास Order ID व Order Date प्राप्त झाल्यापासून) ७ कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांत चित्रीकरणासाठी परवानगी मान्य करणे अथवा नाकारणे सदर यंत्रणेवर (Stakeholder) बंधनकारक असेल.

१२. निर्मात्याचा अर्ज प्राप्त झालेल्या दिनांकापासून ७ कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांमध्ये (Seven Working Days) चित्रीकरणस्थळाशी संबंधित शासकीय / निमशासकीय यंत्रणा (Stakeholders) यांच्याकडे पाठपुरावा करुनही संबंधित यंत्रणेने चित्रीकरण परवानगी संदर्भातील आवश्यक कार्यवाही न केल्यास सदर यंत्रणेची चित्रीकरणास कोणतीही हरकत नाही असे गृहीत धरुन (Deemed No Objection) चित्रनगरी महामंडळामार्फत (संनियंत्रण संस्था) चित्रीकरणासाठी परवानगी देण्यात येईल.

१३. चित्रीकरणासाठी निर्मात्यास परवानगी दिल्यानंतर संनियंत्रण संस्थेद्वारे चित्रीकरण स्थळांशी संबंधित यंत्रणांना (Stakeholder) त्यांच्या शुल्काची रक्कम चित्रिकरणाच्या अखेरच्या दिवशी व अपवादात्मक परिस्थितीत चित्रीकरण संपल्यापासून २ दिवसांत (Two Days) ई- पेमेंटव्दारे अदा करण्यात येईल.

१४. चित्रीकरणस्थळांशी संबंधित शासकीय / निमशासकीय यंत्रणा (Stakeholders) यांनी परवानगी नाकारल्यास, त्याबाबतचे कारण चित्रनगरी महामंडळामार्फत (संनियंत्रण संस्था) निर्मात्यास पोर्टलद्वारे डॅशबोर्डवरुन तात्काळ कळविण्यात येईल. निर्मात्याने ई-पेमेंटद्वारे जमा केलेली रक्कम प्रक्रिया शुल्क (Processing Fee) वगळून, परवानगी नाकारले दिवशी व अपवादात्मक परिस्थितीत पुढील २ दिवसांत (Two Days) ई-पेमेंटव्दारे अदा करण्यात येईल.

१५. सद्यस्थितीत इतर यंत्रणांनी (Stakeholders) परवानगी / ना-हरकत दिल्याशिवाय काही शासकीय / निमशासकीय यंत्रणा परवानगी / ना-हरकत देत नाहीत. तथापि, एक खिडकी योजनेमध्ये परवानगी / ना-हरकत देण्यासाठी, या योजनेत समाविष्ट असणाऱ्या एका यंत्रणेला दुसऱ्या यंत्रणेवर अवलंबून राहण्याची आवश्यकता नाही. कारण सर्व शासकीय / निमशासकीय यंत्रणांची परवानगी / ना-हरकत विचारात घेऊन चित्रीकरणासाठी अंतिम परवानगी देण्याची कार्यवाही संनियंत्रण संस्थेमार्फत करण्यात येईल. त्यामुळे शासकीय / निमशासकीय यंत्रणेने इतर शासकीय यंत्रणांच्या परवानगी / ना- हरकतीवर अवलंबून न राहता आपली परवानगी / ना- हरकत स्वतंत्रपणे तात्काळ संनियंत्रण संस्थेस अवगत करणे आवश्यक राहील.

१६. चित्रीकरणाच्या एकाच स्थळासाठी जेव्हा या योजनेत सहभागी विविध यंत्रणांकडून ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक असेल तेव्हा सर्व संबंधित यंत्रणांनी असे प्रमाणपत्र दिले तरच विहित मुदतीत संनियंत्रण संस्थेमार्फत परवानगी देण्यात येईल. मात्र त्यापैकी एका यंत्रणेने जरी ना-हरकत प्रमाणपत्र नाकारले तर संबंधित स्थळावर चित्रीकरणासाठी परवानगी नाकारल्याचे विहित मुदतीत निर्मात्यास कळविण्यात येईल.

१७. एक खिडकी योजनेच्या वेब पोर्टलवर चित्रीकरण ना-हरकत प्रमाणपत्रासाठी प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळातर्फे प्रकिया शुल्क (Processing Fee) म्हणून रु.२,०००/- इतके शुल्क ना परतावा तत्वावर आकारण्यात येईल.

१८. चित्रीकरणासाठी एकदा परवानगी दिल्यानंतर निर्मात्यास चित्रिकरणाचे आरक्षण रद्द करता येणार नाही व त्यासाठीचे चित्रीकरण शुल्क परत केले जाणार नाही.

१९. चित्रीकरणासाठी परवानगी दिल्यानंतर अपरिहार्य कारणास्तव संबंधित यंत्रणेकडून परवानगी

रद्द केल्यास प्रकिया शुल्क (Processing Fee) वगळून उर्वरीत चित्रीकरण शुल्क निर्मात्यास परत करण्यात येईल.

२०. चित्रीकरणासाठी अर्ज सादर केल्यापासून चित्रीकरणास परवानगी प्राप्त होणाच्या कालावधीत जर निर्मिती संस्था / निर्मात्याने अर्ज रद्द करण्याची विनंती केली तर प्रकिया शुल्क (Processing Fee) वगळून उर्वरीत चित्रीकरण शुल्क निर्मात्यास परत करण्यात येईल.

२१. निर्मात्यास चित्रीकरणासाठी परवानगी दिल्यानंतर काही नैसर्गिक आपत्तीमुळे चित्रीकरण होऊ शकले नाही तर निर्मात्यास चित्रीकरण शुल्काची रक्कम परत केली जाणार नाही.

२२. ज्या चित्रीकरणस्थळासाठी अनामत रक्कम निर्मात्याने ई-पेमेंटव्दारे भरली आहे अशा प्रकरणी संबंधित निर्मात्यास चित्रीकरणानंतर अनामत रक्कम परत करणे आवश्यक असल्याने सदर अनामत रक्कम चित्रनगरी महामंडळाकडेच राहील. चित्रीकरण पूर्ण होऊन संबंधित यंत्रणेकडून अनामत रकमेबाबत कोणताही नुकसान भरपाई दावा प्राप्त न झाल्यास चित्रनगरी महामंडळामार्फत सदर अनामत रक्कम चित्रीकरण संपल्याच्या दिनांकापासून २ कार्यालयीन कामकाजाच्या दिवसात (Two Working Days) निर्मात्यांस परत दिली जाईल.

२३. सदर योजनेची यशस्वीरित्या अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संनियंत्रण संस्था म्हणून चित्रनगरी महामंडळाची राहील. मात्र गोरेगाव चित्रनगरी महामंडळ ही संनियंत्रण संस्था फक्त निर्माता व शासकीय / निमशासकीय यंत्रणा यांच्यामध्ये समन्वय साधण्याचे काम करणार आहे. निर्मात्यास चित्रीकरणासाठी परवानगी देण्याची पूर्ण जबाबदारी संबंधित शासकीय / निमशासकीय यंत्रणेची असेल. यासाठी शासकीय यंत्रणांनी त्यांच्या अखत्यारितील चित्रीकरण स्थळावर चित्रीकरण करण्यासाठी परवानगी देण्याकरीताच्या अटी व शर्ती काळजीपूर्वक निश्चित कराव्यात जेणेकरुन, त्या अटी व शर्तीनुसार निर्मात्यास चित्रीकरणाची परवानगी दिली जाईल.

२४. चित्रीकरण स्थळाशी संबंधित सर्व यंत्रणांनी या योजनेसाठी एक संनियंत्रण अधिकारी नेमणे आवश्यक आहे. निर्मात्यांचा अर्ज प्राप्त झाल्यापासून ७ **कार्यालयीन कामकाजाच्या** दिवसांत परवानगी देणे अथवा नाकारणे याबाबतची जबाबदारी संबंधित संनियंत्रण अधिकारी यांची राहिल.

२५. चित्रीकरणास परवानगी देण्याबाबतच्या एक खिडकी योजनेच्या उपरोक्त नमुद वेब पोर्टलवर चित्रीकरणस्थळांची तसेच त्या स्थळांशी संबंधित शासकीय / निमशासकीय यंत्रणा (Stakeholders) यांची यादी उपलब्ध आहे.

२६. मात्र सदर यादी व्यतिरिक्त नवीन स्थळाची चित्रीकरणासाठी निर्मात्यांकडून मागणी प्राप्त झाल्यास सदर मागणी नुसार नवीन स्थळ ज्या शासकीय / निमशासकीय यंत्रणेच्या अधिपत्याखाली आहे त्या यंत्रणेची सहमती घेऊन त्या स्थळाचा वेब पोर्टलवरील चित्रीकरण स्थळांच्या यादीत कायम स्वरुपी समावेश करण्यात येईल. अशा प्रकारे वेळोवेळी चित्रीकरण स्थळांची व त्यानुसार संबंधित यंत्रणांची (Stakeholders) यादी अद्यावत करण्याची जबाबदारी संनियंत्रण संस्थेची राहील. तसेच यादीत नव्याने समाविष्ट होणाऱ्या शासकीय यंत्रणा (Stakeholders) यांना या शासन निर्णयानुसार कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

२७. चित्रीकरण स्थळासंदर्भातील सर्व आवश्यक ना-हरकत / परवानग्या एक खिडकी योजने मार्फत ऑनलाईन पध्दतीने घेणे बंधनकारक राहील. ऑफलाईन पध्दतीने निर्गमित करण्यात आलेली चित्रीकरण परवानगी ग्राह्य धरण्यात येऊ नये. सर्व संबंधित शासकीय / निमशासकीय यंत्रणा तसेच निर्मिती संस्थांनी याची नोंद घ्यावी.

२८. सदर एक खिडकी योजनेकरीता. आवश्यकता भासल्यास आर्थिक तरतूद करण्याची कार्यवाही चित्रनगरी महामंडळाने त्यांच्या स्वनिधीतून करावी.

२९. सदर योजनेमध्ये काही सुयोग्य दुरुस्त्या, बदल, सुधारणा करावयाच्या असल्यास अशा दुरुस्त्या, बदल, सुधारणा सांस्कृतिक कार्य विभागाकडून वेळोवेळी केल्या जातील. त्याचप्रमाणे चित्रीकरण स्थळांसंदर्भात संबंधित मंत्रालयीन विभागांकडून विहित केलेल्या अटी व शर्तींचे पालन करणे निर्मात्यास बंधनकारक राहील. सदर योजना सेवा हमी कायद्यांतर्गत आणण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेत क्रमांक २०२२०३०४१६४१४३७०२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( विलास रा.थोरात )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
४. मा.राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
५. मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय ,मुंबई
६. मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई.
७. सर्व सन्माननीय विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.
८. महालेखापाल (लेखा व परीक्षा ) एक, महाराष्ट्र, मुंबई
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) एक, महाराष्ट्र, मुंबई
१०. सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव / सचिव यांचे स्वीय सहायक, सर्व मंत्रालयीन विभाग,मुंबई
११. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य
१२. विभागीय आयुक्त - कोंकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर
१३. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र
१४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पू), मुंबई
१५. चित्रिकरण स्थळांशी / परवानग्यांशी संबधित सर्व शासकीय / निमशासकीय यंत्रणा - दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पू), मुंबई यांच्या मार्फत.
१६. संचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीकरीता)
१७. निवड नस्ती, सां.का.१